
# छात्र प्रबोधन

सौर भाद्रपद, शके १९४५ । वर्ष २३ अंक १२।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष ३२ अंक २)
वार्षिक वर्गणी ₹ २५०। मूल्य ₹ २५। पृष्ठे २८

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!



या पद्याची चाल ऐका
आणि पद्य म्हणा!

## खळखळ धावत...

खळखळ धावत फेसाळत हा सागर उसळत येतो
मर्यादांना उल्लंघुनि नव आव्हाना घेतो ।। ध्रु. ।।

धवलगिरीच्या उंच उंच शिखरांचा बांध न ज्याला
प्रलयंकर मरुताची आहे साद जवाना तुजला ।। १ ।।

विक्रमगाथा इतिहासाच्या पानोपानि जयांची
त्या रणवीरा नमन करोनी धाव पुढे घ्यायची ।। २ ।।

आकर्षण गुरुतम धरतीचे सहज लीलया भेदी
विज्ञानाची गरुड भरारी तिच्यावरी तव कडी ।। ३ ।।

मर्यादांनी मर्यादुन? छे!! त्यांना उल्लंघुनी
पुढे पुढे चालणे असू दे हेच ध्येय तव मनी ।। ४ ।।

– विश्वनाथ गुर्जर





**पद्याचा भावार्थ :** निसर्गातील भव्य-दिव्य, अमर्याद, अफाट गोष्टी आणि इतिहासातील कर्तृत्ववान व्यक्ती यांचा दाखला देत प्रस्तुत पद्यातून तरुणाईला एक महान संदेश दिला आहे.

खळखळ धावत, उसळणाऱ्या, फेसाळणाऱ्या समुदाला ना किनाऱ्याचं बंधन असतं, ना क्षितिजाचं! वादळवाऱ्यावर मात करत सतत नवीन आव्हानं झेलत आपल्या अमर्याद थोरवीचं दर्शन तो घडवत राहतो. तीच गोष्ट प्रलय घडवण्याचं सामर्थ्य असणाऱ्या वाऱ्याची! हिमालयाची उंचउंच शिखरं त्याला अडवू शकत नाहीत. तो अमर्याद सामर्थ्य असलेला सागर, कुणालाही न जुमानणारा वादळवारा तुम्हा तरुणांना त्यांच्यासारखाच अमर्याद पराक्रम करण्यासाठी साद घालतो आहे.

इतिहासाच्या पानापानातून ज्यांच्या पराक्रमाच्या कथा प्रेरणा देतात, त्या शूरवीरांना वंदन करून, त्यांचा आदर्श ठेवून तुम्हाला भविष्याकडे वाटचाल करायची आहे. गुरुत्वाकर्षणाच्या नियमानुसार सर्व वस्तू खाली येतात. हे जाणूनही विज्ञानाच्या साहाय्याने माणसाने अवकाशात झेप घेतली आहे. संशोधनाला कोणत्याही मर्यादा उरल्या नाहीत. या सर्वांपासून प्रेरणा घेऊन, कोणत्याही मर्यादा घालून न घेता गरुडझेप घेत तुम्हाला सतत पुढेपुढे जायचे आहे, हेच ध्येय सतत तुमच्या मनी असू दे, असा संदेश प्रस्तुत पद्यात दिला आहे.

ॐ
इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

# छात्र प्रबोधन

सौर भाद्रपद, शके १९४५। वर्ष २३ अंक १२
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ३७४ वा अंक, वर्ष ३२ अंक २)
प्रकाशन दिनांक – सौर १० भाद्रपद, शके १९४५/१ सप्टेंबर २०२३

## अंतरंग

२. पद्य... **खळखळ धावत*** – विश्वनाथ गुर्जर
४. **संवाद** – शिल्पा कुलकर्णी
५. कथा... **टेबलक्लॉथ*** – सुमन नवलकर
१०. ललित... **पहिला पाऊस आणि मातीचे अत्तर*** – आरती परांजपे
१३. कविता... **प्रेम आमुचे चराचरावर...** – आश्लेषा महाजन
१४. लेखमाला... **गप्पा आपल्या देशाच्या! -९ संस्कृतीच्या जपणुकीसाठी सहा 'भ'** – डॉ. वर्षा पाध्ये
१७. ललित... **काश्मीर निसर्गाचा मुक्त आविष्कार!** – कविता मेहेंदळे
१९. माहितीपर... **बासरीमधील विज्ञान** – वाच. कांचनगंगा गंधे
२१. ललित... **... आणि मी चक्क कवी झालो!** – बिपिनचंद्र चौगुले
**याशिवाय :** मासिक स्पर्धा निवेदन (१६), केंद्रप्रमुख यादी* (२४), दु:खद वार्ता (२५) वर्गोद्दिष्ट स्पर्धा*, प्रतिसादी वाचकवीर (२६)

**पानांखालील ओळी : काव्यपंक्ती -** कवि वसंत बापट (स्मृतिदिन-१७ सप्टें. २००२) यांच्या कवितांमधील काही पंक्ती
**माहितीपर** – भारतातील विविध राज्यांमधील प्रसिद्ध गणेश मंदिरं

**अवश्य वाचा... पाहा... ऐका...** * **या लेखांना QR कोड दिले आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.** त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करा.

**मुखपृष्ठाविषयी –** १४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती 'श्री गणेश' याचे आगमन वाजत-गाजत, ढोल-ताशांच्या गजरात होत आहे. या चित्रात गणेशमूर्ती रंगवणारा बालकलाकार, सजावट करणाऱ्या मुली आणि आरती, स्तोत्र, श्लोक म्हणणारी मुलं आहेत. या निमित्ताने श्रवण-पाठांतर होते. तसेच मुलांना आपले गुण-कलागुण सादर करण्याची संधी मिळते, आपल्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळतो. तेव्हा आपल्यातील कौशल्य ओळखून त्यात पारंगत होण्यासाठी जरूर प्रयत्न करा. गणपती बाप्पा मोरया!!! **– चित्रांजली**

**संपर्क पत्ता :** छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५ **संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org
**इ-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**छात्र प्रबोधन युट्यूब चॅनेल लिंक – सभासद व्हा!**
https://youtube.com/@user-rk8py6zj7f

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया
**मानद संपादक**
शैलजा देशमुख
**संपादक मंडळ**
वाच. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन, स्वाती ताडफळे, मल्हार अरणकल्ले
**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी
**साहाय्यक कार्यकारी संपादक**
वैशाली दीक्षित
**मुखपृष्ठ**
चित्रांजली
**आतील चित्रे**
चित्रांजली, दीपक संकपाळ

**छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी**
**वार्षिक :** ₹ २५०, **द्वैवार्षिक :** ₹ ५००, **त्रैवार्षिक :** ₹ ७००, **दशवार्षिक :** ₹ २२००,
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ५० जादा
**इ-अंक वार्षिक वर्गणी :** ₹ १००
(दिवाळी अंक सोडून)
**या अंकाची किंमत :** ₹ २५/-

**पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी व मासिकाच्या ऑनलाइन सभासद नोंदणीसाठी**
**jpprakashane.org**
**या संकेतस्थळाला भेट द्या!!**

चेक/डी.डी. 'ज्ञान प्रबोधिनी' अथवा 'Jnana Prabodhini' याच नावाने काढावा. सोबतच्या क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन/NEFT ने वर्गणी भरल्यावर 'छात्र प्रबोधन'ला मेल करून त्याचे तपशील कळवा.

SCAN HERE TO PAY
WITH ANY BHIM UPI APP
JNANA PRABODHINI

**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे!... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!**

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे ➢ श्री. अनिल पालकर, सातारा ➢ श्री. सतिशचंद्र गोरे, पुणे ➢ श्री. गौरव मोडक, ठाणे ➢ डॉ. विकास हरताळकर, हरताळकर हॉस्पिटल, चोपडा, जि. जळगाव ➢ श्री. अनिरुद्ध शहापूरकर

संवाद

**प्रिय प्रबोधकांनो,**

भारताचे चांद्रयान- ३ दि. २३ ऑगस्ट २०२३ रोजी चंद्राच्या (आजपर्यंत कोणीही पोहोचू शकले नाही) त्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे उतरले. आपल्यापैकी अनेकजण या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार झाले असतील. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा अशीच ही घटना आहे. प्रत्येकाला हे यश 'आपलं' वाटत आहे, यातच मोहिमेचं यश सामावलं आहे. त्यासाठी भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्त्रो) शास्त्रज्ञांच्या प्रयत्नांचं, जिद्दीचं, चिकाटीचं करावं तेवढं कौतुक थोडंच आहे. समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या जगण्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी, समाजाच्या कल्याणासाठी विज्ञान-तंत्रज्ञानाचा उपयोग व्हावा, या उद्दिष्टाने होणाऱ्या या मोहिमा मानवसृष्टीसाठी वरदान आहेत. या पुढे अशा अभिमानाच्या घटनांचे निव्वळ साक्षीदार न होता, त्या घटना यशस्वी करणारे शिल्पकार, यशस्वी गटाचे सदस्य, नेतृत्व करणारे धुरीण तुम्ही व्हायला हवे आहात! त्यासाठीच्या प्रेरणेची, इच्छाशक्तीची बीजं चांद्रयान ३ च्या यशस्वी मोहिमेने रुजावीत अशी अपेक्षा!

ऑगस्ट महिन्यात मी व्यक्तिगत कारणासाठी अमेरिकेला गेले होते. पुण्यातील 'ज्ञान प्रबोधिनी' संस्थेशी निगडित पण सध्या अमेरिकेत स्थायिक झालेल्या काही प्रतिनिधींशी त्या दरम्यान माझ्या भेटी-गाठी झाल्या. या सदस्यांनी मिळून ऑगस्ट २०१९ मध्ये '**ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन**' या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली. प्रबोधिनीच्या माध्यमातून भारतातील ग्रामीण भागाचा विकास, वंचित मुलांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचविणं, महिलांना आत्मनिर्भर करणाऱ्या प्रबोधिनीच्या विविध प्रकल्पांसाठी आर्थिक व अन्य प्रकारांचे योगदान करणं या उद्देशांनी या संस्थेची स्थापना झाली. अमेरिकेतील ही सर्व मंडळी आपापली नोकरी, व्यवसाय सांभाळून आठवड्याचे २ ते ४ तास या अर्थउभारणीच्या कार्यासाठी देतात. काही सदस्य ऑनलाइन व्याख्यानांमार्फत आपल्या तज्ज्ञतेचा उपयोग होतकरू विद्यार्थी व महिलांसाठी करतात.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढावी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सकस, पूरक साहित्य उपलब्ध व्हावे या हेतूने 'जल्लोष वाचना'चा उपक्रम तसेच विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी छात्र प्रबोधनतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना आत्तापर्यंत संस्थेने भरीव आर्थिक योगदान केलं आहे. 'प्रेरणा सेतू' या प्रकल्पांतर्गत विविध शाळांमधील आठवी-नववीच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या क्षेत्रांची माहिती व त्यातील करिअरच्या संधी काय आहेत, याचे ऑनलाइन मार्गदर्शन या सदस्यांद्वारे केलं जातं. हराळी परिसरातील ३५ खेडेगावातील मुलांसाठी 'आनंदशाळा' प्रकल्प राबविला जातो. सोलापूरातील महिला बिडी कामगारांसाठी योगासने-प्राणायाम वर्ग, कागदी-कापडी पिशवी निर्मिती व विक्री केंद्र तर वेल्ह्यातील महिलांसाठी 'आरोग्यसखी' प्रकल्प, आजूबाजूच्या १०० खेड्यांच्या आरोग्याची गरज भागवू शकणारी शिवापूर येथील हॉस्पिटलची उभारणी, पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या खेडेगावात पिण्याच्या पाण्याच्या टाक्या पुरवणे इ. प्रबोधिनीच्या जवळपास २३ प्रकल्पांसाठी अर्थसाहाय्य तर कधी तज्ज्ञता यांचे योगदान संस्थेतील सदस्यांतर्फे दिले जाते. स्वयंसेवी वृत्तीने काम करणारे शंभरहून अधिक सदस्य ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन या संस्थेत सक्रिय आहेत. जगाच्या पाठीवर तुम्ही कुठेही राहात असाल, तरी आपल्या मायभूमीचे रूप पालटण्यासाठी आपण स्वत: काय-काय करू शकतो; याचे कृतिशील उदाहरण अमेरिकेतील 'ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन' या संस्थेच्या सदस्यांच्या रूपाने मी बघितले. त्या सर्वांबद्दल विस्ताराने नंतर लिहीनच; पण आपण काय शिकलो? आणि आपलं शिक्षण समाजाच्या उपयोगी कसं पडेल, याचा विचार मात्र तुम्ही सर्व प्रबोधकांनी, छात्र प्रबोधनच्या वाचकांनी आपणहून आणि नियमितपणे करायला हवा, असं यानिमित्ताने प्रकर्षाने वाटतं.

छात्र प्रबोधनमध्ये दिवाळी अंकांच्या कामांना वेग आला आहे. अंकांतील पान क्र. २७ वर छात्र प्रबोधन दिवाळी अंकाचे तपशील दिले आहेत, त्याची माहिती आपले मित्र-मैत्रिणी, भावंडं यांपर्यंत जरूर पोहोचवा. येणाऱ्या गणेशोत्सवाची जय्यत तयारी सुरू असेल ना! या उत्सवाद्वारे तुमच्यातील कलागुणांना वाव देण्याची संधी घ्या.

तुमची,

**पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी तुम्हाला खूप शुभेच्छा!!!** **शिल्पाताई**

**जाणून घ्या : बोहरा गणेश मंदिर** (राजस्थान) - मध्यभागी गणपतीची उभी मूर्ती असलेले हे गणपती मंदिर ३५० वर्षे जुने आहे.

वार्षिक देणगीदार -
- वाच. अजित कानिटकर, पुणे
- श्री. प्रसाद सांडभोर
- सौ. सुचेता सोनी
- सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे
- सौ. स्मिता चावरे, ऐरोली, नवी मुंबई
- सौ. रजनी सोहनी, पुणे

# टेबलक्लॉथ

– डॉ. सुमन नवलकर

कथा

आजीनं तिचं कपाट साफ करायला घेतलं की, शाश्वत तिच्या बाजूला जाऊन बसायचाच. कपाटात आजीचा खजिनाच होता. तिच्या शाळेतल्या निबंधांच्या वह्या अगदी पत्रावळी झालेल्या होत्या; पण त्यातले निबंध आजीनं खूप छान लिहिलेले होते! शाश्वतनं ते सगळे निबंध वाचले होते. ''इतके छान निबंध लिहायला मला नाही बुवा सुचत. आजी, तू मोठ्ठी लेखिका व्हायला हवी होतीस. का नाही लिहिलीस गं तू खूप पुस्तकं?'' त्यानं एकदा आजीला विचारलंही होतं.

''नोकरी-घर सांभाळता-सांभाळता लिहिणं झालंच नाही बघ,'' आजीनं सांगितलं.

आजीकडे कपाटाच्या तळाच्या खणात एक मोठी चौकोनी पेटी होती. त्यात आजीनं बनवलेले बटवे, भरतकाम केलेले रुमाल, विणलेलं तोरण आणि हो, एक पांढऱ्या रंगाचा *टेबलक्लॉथ* होता; ज्यावर शंकर-पार्वतीचं चित्र रंगीत दोऱ्यांनी भरलेलं होतं. ''*टेबलक्लॉथ* म्हणतात या कापडाला. सोपं असतं यावर भरणं. मुख्य म्हणजे पटापट भरून होतं. नाही म्हणायला, शंकराच्या गळ्यात, मनगटांत, दंडांवर आणि जटेत जे रुद्राक्ष भरलेत ना, ते भरायला मात्र जरा वेळ लागतो,'' आजीनं एकदा सांगितलं होतं.

''पण आजी, यातले मधले-मधले रंगीत दोरे निघालेत कसे गं?''

''अरे बाळा, हा *टेबलक्लॉथ* वापरायला काढला होता. पांढरा असल्यामुळे लगेचच मळायचा. सारखा-सारखा धुतला जायचा. शेवटी त्याचे दोरे निघतायेत हे बघितल्यावर धुवून, घडी करून पेटीतच घालून ठेवलं त्याला. माझ्या बाबांनी हे कापड मला आणून दिलं होतं आणि आईनं भरायला शिकवलं होतं. त्यांची आठवण म्हणून जपून ठेवलाय हा *टेबलक्लॉथ*!'' बोलता-बोलता आजीचा गळा भरून आला.

'आजीचा साठावा वाढदिवस जवळ आलाय. आपण आजीला छानशी भेटवस्तू देऊ. आनंद होईल तिला. पण काय द्यावं बरं?' शाश्वत विचार करू लागला.



गतकाळाची होळी झाली, धरा उंच गुढी । पुराण तुमचे तुमच्यापाशी, ये उदयाला नवी पिढी ।।

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. मिलिंद संत, संतुल, पुणे ➢ श्री. अनिल नेसरी, भूगाव, पुणे ➢ श्री. श्रीपाद कुलकर्णी, नाशिक ➢ श्री. विनय गडीकर, पुणे ➢ श्रीमती आरती अजित पटवर्धन, पुणे ➢ श्री. शशांक चांदोरकर, पुणे

"अरे, आम्ही सगळे देणारच आहोत ना? आमच्या भेटवस्तूंवर तुझंही नाव घालू. मग झालं ना!" आजोबा म्हणाले.

बाबा तर म्हणाले, "तुझ्या पसंतीनंच घेऊ या काय ते. तूही ये माझ्याबरोबर आजीसाठी काय ते घ्यायला." पण ही तर फसवणूक झाली ना! शाश्वतला पटेनाच ते.

"तू मला स्वयंपाकात मदत कर त्यादिवशी," आई म्हणाली; पण शाश्वतला तेही योग्य वाटेना. बरं! हे सगळं गुपचूप चाललं होतं. आजीला कळू न देता. कारण तिला आधीच कळलं, तर मग काय गंमत?

त्या दिवशी खेळून झाल्यावर सगळे कट्ट्यावर बसले होते, तेव्हा शाश्वतनं आपली समस्या कट्ट्यावर मांडली, "आजीचा साठावा वाढदिवस आहे; पण तिला काय द्यावं ते सुचत नाहीये."

"मी माझ्या आजोबांना त्यांच्या आवडीचं *'फ्रूट अॅन्ड नट'* चॉकलेट दिलं होतं. आजोबा खूप खूश झाले होते," पराग म्हणाला.

"मी माझ्या आजीला आंब्याचं आईस्क्रीम दिलं. खूप आवडतं ते तिला," नताशानं सांगितलं.

तेवढ्यात अंकिता म्हणाली, "मी माझ्या आजी-आजोबांच्या लग्नाच्या चाळीसाव्या वाढदिवसाला त्यांना टाकाऊ वस्तूंमधून कलात्मकतेनं छानसं घर बनवून दिलं."

"वाह! अंकिता! आम्ही पण आता आपल्या हातांनी असं काहीतरी बनवून भेट म्हणून घरातल्या मोठ्या माणसांना देऊ. विकत आणून देण्यापेक्षा असं काही करून देणं भारीच!" हर्षित म्हणाला.

शाश्वतला मात्र अजूनही कळत नव्हतं की, आजीला काय द्यावं? पण मग रात्री झोपताना अचानक त्याला ते आजीच्या *टेबलक्लॉथवर*चे शंकर-पार्वती आठवले. सकाळी उठला, तेव्हा त्याचं सारं काही ठरलेलंच होतं. रविवार होता. आई सकाळी बाजारात जाणार होती. शाश्वतही तिच्याबरोबर निघाला.

शाश्वतनं आपल्या *पिगी-बँकमधून* साठलेले पैसे काढून पाकिटात घेतले. बाजारात जाता-जाता त्यानं आईला आपला बेत सांगितला. कलाकुसरीच्या वस्तू बनवण्याचं सामान मिळतं, त्या दुकानात आई त्याला घेऊन गेली. एक *टेबलक्लॉथ* बनेल एवढं कापड आणि *टेबलक्लॉथवर* भरतकाम करण्यासाठी लागणारं सगळं साहित्य आईनं शाश्वतला घेऊन दिलं. पैसे मात्र शाश्वतनं त्याच्या पाकिटातूनच दिले. भेट शाश्वत देणार होता ना आजीला... मग पैसे त्याचेच हवे!

शाश्वतनं आईकडून हातशिलाई शिकून घेतली. दुपारी आजी झोपल्यावर *टेबलक्लॉथला* चारही बाजूंनी त्यानं हातशिलाई केली. मग संध्याकाळी आजी फेरी मारायला बागेत गेल्यावर आजोबांना आणि बाबांनाही आपल्या बेतात सामील करून घेतलं. आजीच्या कपाटातून *टेबलक्लॉथ* काढून घेतला.

बाबांनी मग *टेबलक्लॉथच्या* चित्रावर *ट्रेसिंगपेपर* ठेवून अलगदपणे ते चित्र *ट्रेसिंगपेपरवर* काढून घेतलं. मग नव्या कापडावर मधोमध काळा *कार्बनपेपर* ठेवला. त्यावर *ट्रेसिंगपेपर* ठेवून ते चित्र पेन्सिलने गिरवलं.

एकदाचं चित्र गिरवून झालं. नव्या कापडावर शंकर-पार्वतीचं

**जाणून घ्या : बुधा गणेश मंदिर** (ओडिशा) - हे मंदिर ११ व्या शतकात बांधले गेले असल्याचे मानले जाते.

**वार्षिक देणगीदार -** ➢ श्रीमती रंजना कुलकर्णी, सातारा ➢ श्री. अभिजित लिमये ➢ श्री. प्रशांत माने, पुणे ➢ श्री. विक्रम कामठे, पुणे ➢ श्री. मिलिंद बर्वे, पुणे ➢ सौ. सायली मुळ्ये

चित्र छान उमटलं होतं!
शाश्वतनं दुसऱ्या दिवसापासून त्या चित्रात रंग भरायला सुरुवात केली. आजीचा वाढदिवस जवळ आला होता; पण आजी फक्त संध्याकाळीच घराबाहेर पडायची. त्यामुळे त्याच वेळी *टेबलक्लॉथच्या* चित्रात रंग भरायला जमणार होतं.

सोमवारी संध्याकाळी आईनं *ऑफिसमधून* आल्या-आल्या शाश्वतला उलटी टीप कशी घालायची ते शिकवलं. शंकर-पार्वतीच्या हात-पाय-तोंडाच्या रेषा बदामी रंगाच्या दोऱ्याने उलट्या टिपेने भरायच्या. केसांच्या रेषा काळ्या, पार्वतीचे कपडे आणि शंकराच्या डोक्यावरच्या जटेतून वाहाणारी गंगा निळ्या रंगानं, शंकराचं व्याघ्रांबर यांच्या रेषा तपकिरी-पिवळ्या रंगाच्या दोऱ्यानं भरायच्या! रोज थोडं-थोडं करता-करता मुख्य रेषा उलट्या टिपेने भरून झाल्या. सगळ्यात सोपं होतं, ते रेषांच्या आतले रंग भरणं. कापडाच्या वर-वर आलेल्या धाग्यांमधून रंगीत दोरे फिरवायचे होते.

डोळे-ओठ-नाक-भुवया भरणं जरा बारीक काम होतं. इथे बोथट सुई चालणार नव्हती. ''हे काम या टोकदार सुईनंच करावं लागणार आहे, त्यामुळे हे काम मीच करून देते,'' आईनं समजावलं; पण शाश्वतनं एकही टाका आईला घालू दिला नाही. ''तू त्या दुसऱ्या कापडावर करून दाखव. मी तसंच करेन बघून-बघून,'' त्यानं हट्ट केला.

कापडातून खाली-वर करताना शाश्वतला सुई कितीदा टोचली; पण त्यानं जिद्द सोडली नाही.

सगळ्यात कठीण काम होतं ते शंकराच्या मनगटातले, दंडातले, गळ्यातले रुद्राक्ष भरणं. ''मोती टाका म्हणतात याला,'' आईनं दुसऱ्या कापडावर शाश्वतला मोती टाका घालून दाखवला. खूप बारीक काम असल्यानं त्या संध्याकाळी शाश्वतनं सराव केला. दुसऱ्या दिवशी शनिवार होता. सोमवारी आजीचा वाढदिवस होता. शनिवारी आई लवकर आली. मग दुपारी आजी झोपल्यावर आईच्या पुढ्यात बसून रुद्राक्षाच्या माळा भरायचं काम झालं. शंकराच्या डोक्यावरचा चंद्र, पार्वतीच्या हातातली कमळं, शंकराच्या हातातलं डमरू, त्रिशूळ असं बरंच बारीक-बारीक आणि कठीण काम आईकडून शिकत-शिकत शनिवारी संध्याकाळी आजी बागेत फिरायला गेल्यावर शाश्वतनं पूर्ण केलं. हे बारीक काम करताना ती बारीक सुई बोटांना किती वेळा टोचली; पण आजी फिरून येईपर्यंत शाश्वतनं चित्र पूर्ण केलं!

''आपण याला सुरेखसे गोंडे लावूया उद्या,'' आईनं हे सांगितल्यावर शाश्वतला खूप आनंद झाला.

आईनं शाश्वतला एक गोंडा करून दाखवला. ''हे काम दिसतंय तितकं सोपं नाही,'' शाश्वतनं कबुली दिली. ''दोरा गुंडाळायला मजा येतेय; पण नंतर हे आडवे फेरे घालून गाठ मारणं खूपच कठीण आहे बुवा.''

आईनं पुन्हा-पुन्हा शिकवलं. शाश्वतनं पुन्हा-पुन्हा सराव केला. दोन-तीन गोंडे बांधता-बांधता सुटले; पण शाश्वतनं जिद्द मात्र सोडली नाही. शेवटी एकदाचे गोंडे करून झाले. गोंडे अगदी छान दिसत होते.

*टेबलक्लॉथच्या* कडेकडेने थोड्या-थोड्या अंतरावर शाश्वतनं ते गोंडे जोडले.

शेवटचा गोंडा जेमतेम


वार्षिक देणगीदार - ➢ श्री. सचिन गाडगीळ, पुणे ➢ श्री. समीर गांधी, बेंगळुरु ➢ श्री. ओंकार चांदोरकर
➢ श्री. श्रीकृष्ण करंदीकर ➢ श्री. अजय फाटक, पुणे ➢ श्री. अरविंद परांजपे, पुणे

जोडून होता-होता आजी फिरून आली देखील. त्यामुळे *टेबलक्लॉथ*ला इस्त्री करून, तो रंगीत कागदात बांधायला आणि वर एक लेबल लावून त्यावर नाव लिहायला शाश्वतला आजीच्या झोपण्याची वाट पाहावी लागली.

''इस्त्री कशी द्यायची तुझ्या एकट्याच्या हातात?'' असं आईचं म्हणणं असल्यानं, यावेळी मात्र शाश्वतनं तिचं ऐकलं.

आजी झोपल्यावर *टेबलक्लॉथ*ला आईनं इस्त्री करून दिली; पण तो *टेबलक्लॉथ* रंगीत कागदात बांधून वर *रिबिन* बांधायचं, लेबल लावायचं काम मात्र शाश्वतनंच केलं. नाताळची सुट्टी असल्यामुळे शाश्वतच्या शाळेला सुट्टी होती; पण आजीचा साठावा वाढदिवस म्हणून आई-बाबांनी खास सुट्टी घेतली होती. मग सकाळीच कोणी न उठवताही शाश्वतला जाग आली. कधी एकदा टेबलक्लॉथ आजीला देतोय, असं झालं होतं! सकाळी न्याहारीच्या वेळीच आजोबांनी छानशी साडी, बाबांनी छानसा ड्रेस,



आईनं आजीचं नाव घालून सजवलेला केक असं सगळं आजीला दिलं. मग शाश्वतनं त्याच्याकडची भेटवस्तू आजीला दिली. आजीनं लेबलवरचं नाव वाचलं, 'शाश्वतकडून आजीला वाढदिवसाच्या शुभेच्छा!'

''अरे वा शाश्वत! अरे, वेगळी भेटवस्तू देण्याइतका कधी मोठा झालास तू?'' आजीनं त्याचा गालगुच्चा घेत विचारलं.

तेवढ्यात आईनं आजीच्या आवडीची न्याहारी आणली. गरमा-गरम उपमा आणि चहा.

आज कधी नव्हे तो शाश्वतचा सर्वांच्या आधी उपमा खाऊन झाला. मग आजीने भेटवस्तूवरची *रिबिन* सोडली. आतून पांढराशुभ्र *टेबलक्लॉथ* बाहेर काढला.

''वा!'' आजी सुखावली. मग आजीनं टेबलक्लॉथची घडी उलगडली आणि आजी पाहातच राहिली. आजीचे डोळे भरून आले. 'शंकर-पार्वती!' आजीच्या तोंडून शब्दच फुटेना. 'ही शंकर-पार्वतीची जोडी तर फिक्कट झाली होती. दोरे जीर्ण होऊन निघायला लागले होते. टेबलक्लॉथचं कापडही पिवळट पडलं होतं. ते असं पांढरंशुभ्र कसं झालं? आणि गोंडे? गोंडे कोणी लावले याला?' एवढे सगळे प्रश्न आजीच्या मनात धडाधड उमटले. त्यांची उत्तरं सापडेनात. मग कुठे आजीला जाणीव झाली की, 'हा आपण भरतकाम केलेला टेबलक्लॉथ नाहीच मुळी. मग? अगदी तशीच भरलेली ही जोडी शाश्वतला कुठून मिळाली? याच्या आईनं, शर्वरीनं भरलेला दिसतोय हा *टेबलक्लॉथ*! तिला कुठून वेळ मिळाला हे करत बसायला?' ती आलटून-पालटून चौघांकडेही पाहात राहिली.

शेवटी शाश्वतनं न राहावून विचारलंच, ''काय आजी? आवडली की नाही माझी भेटवस्तू?''

आजीनं डोळ्यांवरून हात फिरवला आणि म्हणाली, ''हे करण्यासाठी आईला त्रास

जाणून घ्या : चिंतामणी गणेश मंदिर (मध्य प्रदेश) – या मंदिरातील गणेशमूर्ती स्वयंभू असून हे मंदिर ११ व्या व १२ व्या शतकातील आहे.

वार्षिक देणगीदार – > सौ. शशिकला उपाध्ये, चंद्रकला प्रकाशन, पुणे > सौ. सुनिता जयंत देगावकर, पुणे > श्री. अमित गद्रे, पुणे
> डॉ. गीतांजली व डॉ. सिद्धार्थ पटवर्धन > सौ. नंदिता माडगीळ, पुणे > एक हितचिंतक, पुणे

द्यायचा का शाश्वत?''

''मला कसला त्रास? माझ्याबरोबर येऊन टेबलक्लॉथसाठीचं सामान घेतलं तेवढंच. हो आणि मला शिकवायला लावलं,'' आईचं बोलणं ऐकून आजी अवाकच झाली! ''म्हणजे हे तू नाही भरलंस? शाश्वतनं भरलं हे सगळं?'' मग आजीनं उठून शाश्वतला मिठीच मारली.



''आजी-आजी शंकर-पार्वती घुसमटतील ना?'' शाश्वतनं चेष्टा केली. मग पुन्हा खुर्चीवर बसून आजीनं टेबलक्लॉथ आपल्या पुढ्यात पसरला. भरतकामाचं बारकाईनं निरीक्षण केलं. रुद्राक्षांवर हात फिरवत आजी म्हणाली, ''हे तर नक्कीच आईकडून भरून घेतलं असणार.'' शाश्वतनं आडवी मान हलवलेली पाहून आजी पुन्हा चकित झाली! मग कापड उलट करून आजीनं दोऱ्यांच्या गाठी नीट तपासल्या. ''वा! गाठीपण नीटच मारल्यात. नाहीतर गाठी उसवल्या, तर भरलेलंही उसवत जातं.''

''आता केक कापूया ना?'' आईनं विचारलं. मग आजी पटकन जाऊन आजोबांनी दिलेली साडी नेसून आली.

''वा! आजी काय छान दिसतेस गं तू!'' शाश्वतकडे हसून पाहात आजीनं टेबलक्लॉथ सोफ्याच्या पाठीवर पसरला. मग शंकर-पार्वती नीट दिसतील अशा बेताने सोफ्यावर बसत म्हणाली, ''आता स्टूलवर केक ठेवा; पण फोटोत शंकर-पार्वती दिसले पाहिजेत हं नीट!''

''फोटो तुझा आणि केकचा काढायचाय की, शंकर-पार्वतीचा?'' आजोबांनी चेष्टा केली; पण आजी गंभीरपणे म्हणाली, ''आतापर्यंतच्या माझ्या आयुष्यात मला मिळालेली सर्वांत मौल्यवान भेटवस्तू आहे ही! रोज वापरून-मळवून-धुवून वाट नाही लावायची हं या टेबलक्लॉथची! शाश्वत, मुलांच्या साठीपर्यंत त्यांचे आई-वडील असतातच असं नाही; पण माझ्या साठाव्या वाढदिवसाला माझ्या आई-बाबांची भेट घडवलीस तू मला. थँक्यू शाश्वत!'' बोलता-बोलता आजीनं शाश्वतचे हात हातात घेतले.


या वेळी पाऊस पडल्यासारखे दोघांचेही डोळे एकदमच भरून आले!!


– डॉ. सुमन नवलकर

ए/२० ज्योती बिल्डिंग, प्लॉट नं. ४३/४५बरकत अली दर्गा मार्ग, वडाळा (पूर्व), मुंबई 400037


**जरूर वाचा**
जपानी कथा
भयंकर यंत्र
अनु. : निसीम बेडेकर

गप्पा आपल्या देशाच्या!
लेखांक - ९



# संस्कृतीच्या जपणुकीसाठी सहा 'भ'

– डॉ. वर्षा पाध्ये

तीन-चार महिन्यापूर्वी मीनलताईने बच्चे कंपनीला सहा 'भ' ची गोष्ट सांगितली होती. त्यातला 'भ-भ्रमणा'चा ऐकल्यावर उन्हाळी सुट्टीत सगळ्यांनी 'भ्रमण'ही केलं होतं, आसामच्या राजाची गोष्ट ऐकली होती आणि अनंतदादाची मणिपूरच्या भेटीची कथाही ऐकली होती. आज १५ ऑगस्टचा सोसायटीतला झेंडावंदनाचा कार्यक्रम झाल्यावर सामोसा आणि जिलेबी खात असताना निशाला अचानक 'सहा भ'ची अपूर्ण राहिलेली गोष्ट आठवली.

निशा म्हणाली, ''ताई, विजय कौशलजी महाराज म्हणतात, भारतीय संस्कृतीच्या जपणुकीसाठी 'सहा भ' लक्षात ठेवा; पण एकाच 'भ' बद्दल म्हणजे 'भ्रमणा'विषयी सांगितलंस! बाकीचे राहिले ना!''



रोहित म्हणाला, ''मला आठवतंय एक 'भ' होता 'भाषेचा' आणि एक होता 'भूषेचा.' यातील भाषेबद्दल मी अंदाज करू शकतो. म्हणजे आपण आपल्या मातृभाषेतच बोलायला पाहिजे, वाचायला पाहिजे, शिकायला पाहिजे असंच ना?''

''अगदी बरोबर!'' मीनलताई म्हणाली, ''आपल्या मातृभाषेत बोललं, वाचलं म्हणजे आपल्याला गावाची, शहराची आणि आपण राहतो त्या राज्याची संस्कृती कळते.''

''आणि मातृभाषेतलं शिक्षण कळायला पण सोपं जातं,'' रोहितनं भर घातली, ''लहानपणी असं वाटायचं की, सगळेच *पेपर इंग्लिशचे* आहेत. *सायन्स* काय, *सोशल सायन्स* काय सगळ्याच शब्दांची *स्पेलिंग्ज्* पाठ करत बसायला लागायची मला.''

''अरे सगळीच *स्पेलिंग्ज्* पाठ करायला लागत नाहीत,'' अभिजीतदादा म्हणाला, ''काही क्लृप्त्या असतात. त्या समजल्या की, *स्पेलिंग* करणं सोपं जातं; पण मूळ मुद्दा काय की, आपल्या मातृभाषेचा किंवा मी म्हणतो भारतीय भाषेचा जास्त वापर केला की, भारतीय संस्कृती, साहित्य आणि इतिहास याबद्दल जास्त माहिती मिळेल, आपल्या साहित्याची ओळख होईल, म्हणजे आपल्या देशाचीच खरी ओळख होईल!''

मीनलताई म्हणाली, ''आमच्या लहानपणी *इंग्लिश चॅनेलवर* सामान्य ज्ञानाच्या स्पर्धा होत असत. *सूट-बूट-टाय* घातलेली ती मुलं फाडफाड इंग्रजीतून बोलायची; पण सगळे प्रश्न, अमेरिका, इंग्लंडसारख्या बाहेरच्या देशांबद्दल असायचे. जसं की, अमेरिकेच्या पाचव्या अध्यक्षाचं नाव काय? अमेरिकेमध्ये किती राज्य आहेत? वगैरे.''

निखिल म्हणाला, ''त्याचा आपल्याला काय उपयोग?''

**जाणून घ्या : करपाका विनायक मंदिर** (तामिळनाडू) - हे मंदिर ७ व्या शतकातील असून मोठा खडक कोरून केलेली गुहा आहे.

**वार्षिक देणगीदार -** ➢ डॉ. विनायक देसूरकर, पुणे ➢ श्री. संजय प्रधान, सातारा ➢ चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे
➢ डॉ. कृष्णकांत मानकर, मोशी, पुणे ➢ श्री. सुदीप सुभेदार - कै. प्रभाकर सुभेदार स्मरणार्थ

''हो ना,'' मीनलताई उद्‌गारली, ''मला पण असंच वाटायचं. आपला भारत आधी समजून घ्या, मग बाकीच्या देशांचा इतिहास-भूगोल पाठ करा.''

स्मृती म्हणाली, ''पण हल्ली तर भारतातल्याच वेगवेगळ्या भाषिकांमध्ये भांडणं होत आहेत. मधे तर बंगळुरूमधील एका रिक्षावाल्याचा *व्हिडिओ व्हायरल* झाला होता. तो रिक्षात बसलेल्या प्रवासी मुलींना म्हणत होता की, तुम्ही कानडीतच बोलायला पाहिजे, हिंदीत नका बोलू. त्या परप्रांतीय मुली हिंदीत बोलत होत्या. आता जर थोड्या दिवसांसाठी कर्नाटकात शिकायला किंवा कामाला आल्या असतील; तर त्यांना कन्नड भाषा कशी येणार? हां, जर कौतुकानं शिकली तर चांगलंच आहे; पण माणसानं अडेलतट्टू भूमिका घेतली, तर भांडणं होणारच आणि मजा म्हणजे हे सगळं तो रिक्षावाला इंग्रजीमधून बोलत होता. म्हणजे त्याला हिंदीमधून बोलायला आक्षेप होता; पण इंग्रजीमधून नाही.''



रोहित म्हणाला, ''कमालच आहे. उद्या हाच माणूस काशीला गेला, तर हिंदी बोलायला लागेलच ना त्याला. उगाच कशाला भांडायचं?''

स्मृती म्हणाली, ''आता दक्षिण भारतात प्रत्येक प्रांतात वेगवेगळी भाषा आहे. आंध्रप्रदेशमध्ये तेलुगू, केरळमध्ये मल्याळम, तामिळनाडूमध्ये तमिळ. प्रत्येक भाषा शिकायची म्हणजे अवघडच, म्हणून हिंदीसारखी राष्ट्रभाषा जी साधारणपणे सगळ्यांना येते, ती आपण बोलावी. शेवटी *'भाषा नही भावना समझो,'* असं म्हणायला पाहिजे.''

अभिजीतदादा म्हणाला, ''हो ना, आता आम्ही राजस्थानात गेलो होतो, तेव्हा स्थानिक लोकांशी हिंदीमध्येच बोललो. त्यांनी पण आग्रह नाही धरला की, मारवाडीमध्येच बोला म्हणून.''

मीनलताई म्हणाली, ''अगं, भांडणं घरात पण होतातच ना. आपल्याच भाषेचा अट्टाहास धरला, दुसऱ्याच्या भाषेचा द्वेष केला, तर हे होतच राहणार. वेगवेगळ्या राज्यात जाऊन, तिथं स्थायिक होऊन, तिथली भाषा शिकून, दुधात साखर जशी विरघळते तशी राहणारी माणसं पण पुष्कळ आहेत.''

अभिजीतदादा म्हणाला,

*''अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम्।*
*उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्।।''*

''ए परत तुम्ही संस्कृत सुरू...'' निखिलनं एकदम जीभ चावली. ''असू दे, अर्थ सांग दादा फक्त. हे बऱ्याच वेळा ऐकलंय.''

''अरे, हे माझं, हे दुसऱ्याचं असा विचार कोत्या म्हणजे छोट्या मनोवृत्तीची माणसं करतात. मोठ्या मनाची लोकं 'ही सर्व पृथ्वीच आपलं कुटुंब आहे' असं मानतात,'' दादानं स्पष्ट केलं.

''मग हाच नियम इंग्रजी भाषेला लावा की, आपण का त्या भाषेचा द्वेष करायचा आणि मराठीचा अट्टहास धरायचा? आज सगळं ज्ञान इंग्रजीत आहे. अगदी पूर्वी कौतुकानं आपल्या भाषेचा अत्यंत अभिमान बाळगणारे म्हणून ज्यांची नावं


वार्षिक देणगीदार - ➢ श्री. किशोर पंडित, चेंबूर, मुंबई ➢ मे. बडवे इंजिनियर्स प्रा. लि., पुणे ➢ श्री. संतोष साटम, पुणे
➢ श्री. विद्याधर सहस्रबुद्धे, ठाणे ➢ श्री. अतुल कुलकर्णी, पुणे - श्रीमती सुशीलाताई कुलकर्णी यांचे स्मरणार्थ

घेतली जायची त्या जपान, जर्मनी, रशियासारख्या देशातही लोक इंग्रजी शिकत आहेत, मग आपणच का उलटं पोहायचं?''

''अगदी बरोबर निखिल. इंग्रजी भाषेचा द्वेष नाहीच करायचा. इंग्रजी तर शिकायचीच आणि त्यात पारंगतसुद्धा व्हायचं; पण म्हणून मराठी भाषा सोडायची, असं नाही ना होत. आपल्याला तितकीच किंबहुना त्याहूनही अधिक मराठी यायला हवी. इंग्रजी, हिंदी आणि आपली मातृभाषा सर्वांनी शिकावीच. हिंदी मातृभाषा असलेल्या सर्वांनी आपल्या आवडीची एखादी भारतीय भाषा शिकावी असं माझं म्हणणं आहे,'' अभिजीतदादा म्हणाला.

''सारांश म्हणजे, मातृभाषेचा जास्तीत जास्त वापर करायचा, भारतातील दुसऱ्या भाषांना व भाषिकांना पण मान द्यायचा आणि इंग्रजी पण शिकायची,'' इक्बाल म्हणाला.

''अगदी बरोबर इक्बाल! चलो इस बात पर एक और जलेबी हो जाए,'' अभिजीतदादाने त्याच्या पाठीवर थाप मारली आणि कौतुकानं एक जिलबी इक्बालला भरवली.

''या गणपतीत प्रत्येकानं एका भारतीय भाषेतलं गाणं आपल्या 'विविध गुणदर्शन' कार्यक्रमात सादर करायचं. दोघा-तिघांनी मिळून त्या गाण्यावर नाच बसवला तर अजूनच उत्तम! काय करणार ना?'' मीनलताईनं सुचवलं. ''नेकी और पूछ पूछ? जरूर करणार!'' स्मृती म्हणाली.

– डॉ. वर्षा पाध्ये
varshapadhye@yahoo.com

**छात्र प्रबोधनतर्फे कुमारांसाठी (इ.५ वी ते ११ वी) दरमहा नावीन्यपूर्ण स्पर्धा!**

**'प्रबोधन ऐपावाक' वैयक्तिक व सांघिक स्पर्धा!**

**स्पर्धा क्र. ३ -सप्टेंबर २०२३ या महिन्यातील स्पर्धा**

**१. वैयक्तिक स्पर्धा – कवितेला चाल लावणे**

- या स्पर्धेसाठी छात्र प्रबोधन अंकातील 'कविता' निवडाव्यात.
- चाल लावलेल्या कवितेची ध्वनिफीत (ऑडिओ) ५-७ मिनिटांपेक्षा जास्त नसावी. यासाठी वाद्यांची साथ-संगत सुद्धा चालेल.
- www.chhatraprabodhan.org या वेबसाइटवर छात्र प्रबोधनचे ३०० पेक्षा अधिक अंक मोफत उपलब्ध आहेत. त्यातून तुम्ही 'कवितेची' निवड करून स्पर्धेसाठी त्याचे वाचन करू शकाल.
- jpprakashane.org या संकेतस्थळावर कविता संग्रहाची पुस्तके उपलब्ध आहेत. ती तुम्ही खरेदी करू शकता.

**२. सांघिक स्पर्धा – विज्ञान प्रयोग/ विज्ञान खेळणे**

- किमान ३-४ विद्यार्थ्यांचा गट असावा.
- छात्र प्रबोधनच्या अंकातील विज्ञान प्रयोग निवडावेत.
- प्रयोग करताना त्याच्या साहित्यासहित विश्लेषण करून प्रयोग केलेली चित्रफीत (व्हिडीओ) पाठवावी.
- ही चित्रफीत १० मिनिटांपेक्षा जास्त नसावी (त्यात स्पष्ट आवाज व पुरेसा प्रकाश असेल असे पाहावे)

**❋ बक्षिसे ❋**

१) वैयक्तिक स्पर्धा – किमान गुणवत्तेच्यावर पहिल्या ४ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.१००/-छात्र प्रबोधनची प्रकाशने भेट!
२) सांघिक स्पर्धा – किमान गुणवत्तेच्यावर पहिल्या ४ गटांना प्रत्येकी रु. २५०/- ची छात्र प्रबोधनची प्रकाशने भेट!

बक्षिसप्राप्त विद्यार्थ्यांचे/गटांचे ध्वनी/चित्रफिती 'प्रबोधन ऐपावाक' या ॲपवर प्रसिद्ध होतील.

स्पर्धेसाठीचे चित्रफीत / ध्वनिफीत **३० सप्टेंबर २०२३ पर्यंत** पुढील इ-मेल आयडी वर पाठवावेत. त्यामध्ये आपले नाव, शाळा, इयत्ता, दूरध्वनी क्र., कवितेचे व कवीचे नाव/विज्ञान प्रयोगाचे नाव व ते ज्या अंकातून घेतले आहे त्याचे तपशील इ. माहिती आवर्जून लिहावी. इ-मेल आयडी : **aipavakspardha@gmail.com**

जाणून घ्या : ढोलकल गणेश मंदिर (छत्तीसगढ) - १० व्या ते ११ व्या शतकादरम्यान नागा राजवटीत बनवलेली गणेशमूर्ती येथील आकर्षण आहे.

वार्षिक देणगीदार - > श्री. अमित बागाईतकर, पुणे > श्री. आदित्य करंदीकर, पुणे > श्री. निश्चल गोरे, हैद्राबाद > श्री. सचिन जोगळेकर, पुणे > श्री. गिरीश पळसकर, बंगळुरु - कै. शरद पळसकर स्मृतिप्रीत्यर्थ

## खास कुमारांसाठी
# छात्र प्रबोधनतर्फे ३ दिवाळी अंक!

## छात्र प्रबोधन दिवाळी अंक

**नित्य अंक – सवलतीत अंक ₹ ६०/– मूळ किंमत – ₹ १३०/–**

• कुमारांच्या भावविश्वाशी जवळीक साधणाऱ्या, प्रतिकूल परिस्थितीत आंतरिक ओलावा टिकवून ठेवणाऱ्या भावकथा, रूपककथा, विज्ञान – **कथा.** • नाट्यछटा, हृद्य आठवणींपर, रसास्वादात्मक **ललित लेख!** • सामाजिक, निसर्गपर, भावपर, आशयसमृद्ध **कविता!** • विज्ञान–तंत्रज्ञान, सद्य घडामोडींवर आधारित **माहितीपर लेख!** • व्यक्तिमत्त्व फुलवण्यासाठी उपयुक्त, **प्रेरणादायी लेख!** • **याशिवाय** – कलाकृती, विज्ञान प्रयोग, शब्दखेळ, कोडी, विनोद, भाषेच्या गमतीजमती इ.
• **मान्यवर लेखक** – प्रवीण दवणे, ऐश्वर्य पाटेकर, स्वाती राजे, क्षितिज देसाई, डॉ. प्रदीप आवटे, भूषण हर्षे, आश्लेषा महाजन, एकनाथ आव्हाड, मृणालिनी कानिटकर, मोहन शेटे, सुजाता होनप, डॉ. नंदा हरम इ.

गेल्या वर्षीच्या दिवाळी अंकाची झलक पाहाण्यासाठी स्कॅन करा.

## सुबोध दिवाळी अंक (ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी)

**सवलत मूल्य – छापील अंक ₹ ३०/–, मूळ किंमत ₹ ६०/–**

• हृदयस्पर्शी भावकथा, रहस्यमय साहसकथा, संस्कारक्षम **कथा** • आठवणींपर, अनुभवपर, भटकंतीविषयक **ललित लेख!** • आशयघन **कविता!** • दैनंदिन विज्ञान–तंत्रज्ञानावरील **माहितीपूर्ण लेख!** • **व्यक्तिमत्त्व विकसनपर लेख!**
• **याशिवाय** – विनोद, कोडी, कलाकृती, विज्ञान प्रयोग इ.
• **मान्यवर लेखक** – संजीवनी बोकील, फारुख काझी, सरोज चौगुले, रेणू दांडेकर, आदित्य दवणे, क्षितिजा आगाशे, पल्लवी शेवाळे, अशोक कौतिक कोळी इ.

गेल्या वर्षीच्या सुबोध दिवाळी अंकाची झलक पाहाण्यासाठी स्कॅन करा.

## English Diwali Issue

**Discount Price ₹ 60 /- Original Price : ₹ 100/-**

• Engrossing humour, suspense, inspirational, and science fiction **stories** • Pathbreaking **narratives,** interesting biographical write-ups; enthralling travelogue • **exciting informative** articles about woodwork, plants, environment • delightful **poems** • enriching articles on self-introspection, maturity • imaginative and educative **children's play** • innovative Hands-on activities – art, craft and many more...
**Eminent Authors** - Uma Karve, Nutan Karnik, Harshada Babrekar, Jalashree Shrikhande, Rohan Deshpande, Hemal Patel, Vaidehi Godebole, Anmol Deshpande.

दिनदर्शिका २०२३ झलक

**कुमारांसाठी विशेष दिनदर्शिका २०२४**
निव्वळ दिनदर्शिका नव्हे तर व्यक्तिमत्वविकसनाचा खजिना
**मूळ किंमत रु. ४०/–, सवलतीत रु. २०/–**

To see the glimpses of last year's Diwali Issue Scan.

तीनही दिवाळी अंकांत..
* अंकातील निवडक लेखांना QR code द्वारा pdf व दृक्/श्राव्य क्लिप्स्‌ची जोड!
* आकर्षक, कल्पक भेट

**५ ऑक्टोबर पर्यंत सवलतीच्या दरात** प्रकाशनपूर्व **नोंदणी करा.**
**१ नोव्हेंबर नंतर** अंक सर्वत्र उपलब्ध!

नोंदणीसाठी...
**jpprakashane.org** या साइटवरून पैसे भरून दिवाळी अंकांची नोंदणी करा. छापील अंक घरपोच मिळण्यासाठी वेगळी रक्कम भरावी लागेल... (तपशील साइटवर!)

स्थानिक केंद्रांवर आपल्या अंकाची नोंदणी करा. (तपशील आतील पानावर)

**सर्व सभासदांसाठी विशेष सूचना**
* आपल्या वर्गणीतला छापील दिवाळी अंक घरपोच मिळण्यासाठी सभासदांनी ₹ ५०/– ५ ऑक्टो.पूर्वी छात्र प्रबोधनकडे पाठवावेत. (पूर्वी भरले असल्यास पुन्हा भरू नयेत.)

**अधिक माहितीसाठी** – छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे–३०. ☎ (०२०) २४२०७ १७४/१७५
**इ–मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org **संकेतस्थळ :** chhatraprabodhan.org

सौर भाद्रपद, शके १९४५/सप्टेंबर २०२३ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर १० भाद्रपद, शके १९४५/१ सप्टेंबर २०२३
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2021-2023
Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-9-2023

**सौर दिनदर्शिका शके १९४५**

| | सौर भाद्रपद आश्विन | सप्टेंबर २०२३ |
|---|---|---|
| शु. | भा.१० | 1 |
| श. | ११ | 2 |
| र. | १२ | 3 |
| सो. | १३ | 4 |
| मं. | १४ | 5 |
| बु. | १५ | 6 |
| गु. | १६ | 7 |
| शु. | १७ | 8 |
| श. | १८ | 9 |
| र. | १९ | 10 |
| सो. | २० | 11 |
| मं. | २१ | 12 |
| बु. | २२ | 13 |
| गु. | २३ | 14 |
| शु. | २४ | 15 |
| श. | २५ | 16 |
| र. | २६ | 17 |
| सो. | २७ | 18 |
| मं. | २८ | 19 |
| बु. | २९ | 20 |
| गु. | ३० | 21 |
| शु. | ३१ | 22 |
| श. | आ. १ | 23 |
| र. | २ | 24 |
| सो. | ३ | 25 |
| मं. | ४ | 26 |
| बु. | ५ | 27 |
| गु. | ६ | 28 |
| शु. | ७ | 29 |
| श. | ८ | 30 |



**कुमारांच्या कुंचल्यातून साकारलेले चित्र!**

– **कु. आर्या पाटील** (इ. १२ वी), निगडी, पुणे

सभासदांनी आपले व्हॉटस्‌ॲप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९०११११६१४४५ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी वेळोवेळी संपर्क साधता येईल. स्पर्धा, उपक्रम, व्याख्याने, नवीन प्रकाशने यांची माहिती पोहोचवता येईल.

छात्र प्रबोधनद्वारा प्रकाशित **दिनदर्शिकेतील सप्टेंबर महिन्याचे पान** पाहाण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा!

**सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.**

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
**इ–मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**वार्षिक वर्गणी :** ₹ २५०/–
ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी व पुस्तक खरेदीसाठी :
**www.jpprakashane.org**

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे, ही आग्रहाची, प्रेमळ विनंती.

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन